RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैंनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

जनतेच्या मनात राज करणारे विदर्भातील एकमेव दैनिक

अमरावती
१ गुरुवार जानेवारी २०२६
✽ वर्ष ५ ✽ अंक २१६
✽ पृष्ठ : ४ ✽ मूल्य रु : ३

## पुतळ्यावरून तणाव ; पोलीस बंदोबस्त वाढविला

▸विदर्भ केसरी। मानवत :

मानवत तालुक्यातील केकरजवळा येथे कोणतीही अधिकृत परवानगी न घेता छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा गावात आणून बसविल्याने सोमवारी (दि. २९) तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस व तहसील प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत बंदोबस्त वाढवला. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (ता. २८) रात्रीच्या सुमारास काही ग्रामस्थांनी केकरजवळा गावातील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील एका रिकाम्या मैदानात लोखंडी स्टँडवर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणून ठेवला. सोमवारी सकाळी ही बातमी पसरताच प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली . कोणतीही अधिकृत परवानगी न घेतल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलीस निरीक्षक संदीप बोरकर व नायब तहसीलदार स्वप्ना अंभोरे यांनी नियमांनुसार परवानगी घेऊनच पुतळा उभारावा, अशा सूचना ग्रामस्थांना दिल्या.

## खासदार संजय राऊतांना बॉम्बने उडवण्याची धमकी ;

▸विदर्भ केसरी।

: मुंबईतील भांडुप परिसरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांना ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. अज्ञात व्यक्तीने थेट बॉम्बस्फोटाची धमकी दिल्यामुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे. संजय राऊत हे कुटुंबासह भांडुप परिसरात वास्तव्यास आहेत. त्यांच्या घराबाहेर अनेक दिवसांपासून एक मोटारगाडी उभी होती. ही गाडी बराच काळ न हलवल्यामुळे तिच्यावर मोठ्या प्रमाणात धूळ साचली होती. याच धुळीवर अज्ञात व्यक्तीने अत्यंत धक्कादायक शब्दांत धमकीचा मेसेज लिहिला होता. "आजची रात्र संजय राऊत यांची शेवटची रात्र असेल, बॉम्बने उडवून देऊ," अशा आशयाचा मजकूर या वाहनावर लिहिल्याचे निदर्शनास आले.

## आगाराचा कारभार 'रामभरोसे

▸विदर्भ केसरी। विशाळगड :

कोल्हापूरहून मलकापूरकडे आणि मलकापूरहून कोल्हापूरकडे येणाऱ्या राज्य परिवहन मंडळाच्या बससेवेचा सध्या मोठा फज्जा उडाला आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळी बस नियोजित वेळेवर सुटत नसल्याने नोकरदार, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे. मलकापूर आगाराच्या या 'अंदाधुंदी' कारभारामुळे प्रवाशांतून तीव्र संताप व्यक्त केला जात असून, एसटी प्रशासनाचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. लकापूर आणि कोल्हापूर ही दोन्ही शहरे व्यावसायिक आणि शैक्षणिकदृष्ट्या जोडलेली आहेत. दररोज हजारो प्रवासी




न्यूझीलंडपासून सिंगापूरपर्यंत, नवीन वर्षाचे आगमन झाले आहे. जपान, चीन आणि सिंगापूरने फटाक्यांच्या आतषबाजीने नवीन वर्ष साजरे केले. दक्षिण कोरियामध्ये, नवीन वर्षाच्या आगमनाची घोषणा करण्यासाठी एक मोठी घंटा वाजली. ऑस्ट्रेलियातील सिडनी हार्बर येथे पारंपारिक फटाक्यांच्या प्रदर्शनांना पाहण्यासाठी हजारो लोक जमले होते. दरम्यान, सात मिनिटांच्या फटाक्यांच्या प्रदर्शनाने मेलबर्नचे आकाश उजळून निघाले.

# "सॉरी फॅमिली मी तुमचा आधार नाही बनू शकलो अन् आत्महत्या

▸विदर्भ केसरी।

11दुपारी दोन वाजताची वेळ, खोलीतून काहीच आवाज येईना म्हणून आजीने पाहिले तर समोर जे दिसलं ते पाहून तिच्या पायाखालची जमीन सरकली, समोर नातवाचा मृतदेह होता तोही लटकत, आजीचे हातपाय लटपटायला लागले आणि तोंडातून जोरात किंकाळी आली.

तिने आरडाओरडा केला. काय घडलं ते तिला समजून घेऊन पचवेपर्यंत काहीसा उशीर झाला होता. तिने आपला नातू गमावला होता. आजीने आजूबाजूच्यांना बोलवलं आणि पोलिसांनाही याची माहिती दिली.

संध्याकाळी सहाच्या सुमारास मृतदेह शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आला. पोलिसांनी तपास केल्यानंतर धक्कादायक बाब समोर आली. 18 वर्षीय तरुणाने आधी इन्स्टाग्राम पोस्ट लिहून मग टोकाचं पाऊल उचललं होतं. 29 डिसेंबर रोजी सकाळी 1 ते 1.30 वाजण्याच्या सुमारास त्याने राहत्या घरी लाकडाच्या



बल्लीला पांढऱ्या शेल्याने गळफास घेऊन आयुष्य संपवलं होतं.

18 वर्षीय तरुणाचे वडील पुण्यात कामाला आहेत. तो आजीसोबत राहात होता. तरुणाने टोकाचा निर्णय का घेतला याचा तपास सुरू आहे. ठोस कारण अद्याप समोर आलं नाही. मात्र त्याने इन्स्टावर पोस्ट लिहिली होती. त्याने आपल्या अंत्यसंस्काराची आणि जाण्याची वेळही सांगितली होती अशी माहिती मिळाली आहे. ही धक्कादायक घटना पुसद शहरापासून 10 किमी अंतरावर असलेल्या हुडी बु. इथे घडल्याची माहिती मिळाली आहे. मृत तरुणाचं नाव शिवराज रामराव दोडके असल्याचं सांगण्यात आलं आहे.

तरुणाने इन्स्टा पोस्ट करुन एक स्टोरी ठेवली होती. त्यामध्ये.. "सॉरी फॅमिली मी तुमचा आधार नाही बनू शकलो. कायम आमच्या हृदयात राहशील, मिस यू किंग, शिवराज दोडके यांचे आज दुपारी १ वाजता निधन आहे. तर अंत्यविधी उद्या १२ वाजून ४५ मिनिटाला आहे. मुक्काम पोस्ट हुडी बु. तालुका पुसद जिल्हा यवतमाळ" लिहून भावपूर्ण श्रद्धांजली शिवराज दोडके अशा प्रकारची बॅनर सदृश्य पोस्ट त्याने, त्याची इंस्टाग्रामवर ठेवली होती. त्यानंतरच आयुष्य संपवलं असल्याचे पोलिसांमार्फत सांगण्यात आलं. इंस्टाग्रामवर त्याचे १,३१७ फॉलोअर होते, तर तो स्वतः ८३ लोकांना फॉलो करत होता.

धक्कादायक बाब म्हणजे त्याने इन्स्टावर स्वतःचा फोटो ठेवून त्याला श्रद्धांजली अर्पण केली होती. त्यासोबत त्याने मृत्यूची आणि अंत्ययात्रेची वेळही दिली होती. हृदय पिळवटून टाकणाऱ्या या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

# ३३ हजार ६०६ उमेदवारी अर्ज

## २९ महापालिका : पुणे महापालिकेत सार्वधिक ३ हजार १७९ अर्ज मुंबईत २ हजार ५१६ अर्ज दाखल




▸विदर्भ केसरी।मुंबई

**मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीत २ हजार ८६९ जागांसाठी विक्रमी ३३ हजार ६०६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.**

**पुणे महापालिकेत सर्वाधिक म्हणजे १६५ जागांसाठी ३ हजार १७९ तर प्रतिष्ठेच्या असलेल्या मुंबईत महापालिकेच्या २२७ जागांसाठी २ हजार ५१६ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले आहेत.**

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची मुदत मंगळवार दि. ३० डिसेंबरला संपली. या मुदतीत २९ महापालिकांमध्ये विक्रमी संख्येने अर्ज आले आहेत. इचलकरंजी महापालिकेत सर्वात कमी म्हणजे ६५ जागांसाठी ४५६ अर्ज आले आहेत. या ३३ हजार ६०६ अर्जांची बुधवारी छाननी करण्यात आली. छाननीत किती उमेदवारी अर्ज बाद झाले याची माहिती उशीरापर्यंत मिळू शकली नाही. २ जानेवारी २०२६ ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. या मुदतीनंतर महापालिका निवडणुकीतील

लढतींचे प्रभागनिहाय चित्र स्पष्ट होऊ होईल.

### महापालिका उमेदवारी अर्ज जागांची संख्या

| | |
|---|---|
| ■ छत्रपती संभाजीनगर : १ हजार ८७० (११५ ) | ■ चंद्रपूर : ६०६ (६६) |
| ■ नवी मुंबई : ९५६ (१११ ) | ■ लातूर : ७५९ (७०) |
| ■ वसई-विरार : ९३५ (११५ ) | ■ परभणी : ९१९ (६५) |
| ■ कोल्हापूर : ८१३ (८१ ) | ■ भिवंडी-निजामपूर : १ हजार ३३ (९०) |
| ■ कल्याण-डोंबिवली : ८६० (१२२ ) | ■ मालेगाव: ७१० (८४०) |
| ■ ठाणे: १ हजार १२८ (१३१ ) | ■ पनवेल: ३९१ (७८) |
| ■ उल्हासनगर : ७०६ (७८ ) | ■ मिरा -भाईंदर : ६३२ (९५) |
| ■ नाशिक : २ हजार ५३६ (१२२ ) | ■ नांदेड-वाघाळा : १ हजार २०३ (८१ ) |
| ■ पिंपरी -चिंचवड: १ हजार ९९३ (१२८) | ■ सांगली-मिरज-कुपवाड : १ हजार ६२ (७८) |
| ■ सोलापूर : १ हजार ४६० (१०२) | ■ जळगाव: १ हजार ३८ (७५) |
| ■ अकोला : ७७७ (८०) | ■ धुळे: ७२१ (७४) |
| ■ अमरावती: १०२७ (८७) | ■ अहिल्यानगर : ७८८ (६८) |
| ■ नागपूर : १ हजार ४५२ (१५१) | ■ जालना : १ हजार २६० (६५) |

## वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास 'सरकारी नोकरी' आणि २५ लाखांची मदत

▸विदर्भ केसरी। सोलापूर :

शेतकरी, शेतमजूर किंवा जनावरे राखणाऱ्या गुराखी यांच्यावर वाघ व बिबट्या या वन्यप्राण्यांनी हल्ला केला व या हल्ल्यात त्यांचा जर मृत्यू झाला तर अशा हल्ल्यांना आता आपत्ती समजले जाईल. वन्यजीवांच्या हल्ल्यात मृत्यू झालेले शेतकरी, शेतमजूर किंवा जनावरे राखणाऱ्या गुराखी यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीसह 25 लाख रूपयांची भरपाई दिली जाणार



असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्याच्या वन विभागाने घेतला आहे

वन्य प्राण्यांच्या हल्ले झालेल्या संबंधित ठिकाणी ट्रॅप व कॅमेरेही बसवण्यात येणार आहेत. गावांतील नागरिक कायम सतर्क राहावेत, यासाठी सायरनची सोय केली जाईल. शिवाय, संवेदनशील भागांचे मॅपिंग केले जाणार असून रेस्क्यूपथक कायम तैनात असणार आहे. सर्व प्रकारच्या वन्यजीवांच्या हल्ल्यांना राज्य आपत्ती ठरवले आहे.

माणूस आणि वन्य प्राणी यामधील संघर्ष रोखण्याकरिता शासनाने पूर्व तयारीची जबाबदारीसुध्दा निश्चित केली आहे. हल्ल्यात शारीरिक दिव्यांगत्व प्राप्त झाल्यास त्याच्या तीव्रतेनुसार मदत दिली जाणार आहे. शिवाय, या प्राण्यांच्या हल्ल्यात झालेल्या जखमेनुसार वैद्यकीय उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाच्या रकमेला आता जलद मंजुरी मिळणार आहे. वर्षभरात जिल्ह्यात मोहोळ, मोडनिंब, अकलूज, बार्शी, वैराग या गावाच्या परिसरात बिबट्या व वाघाचे दर्शन झाले होते. बार्शी तालुक्यातील हा बिबट्या खूप दिवसानंतर धाराशिवमध्ये गेला.

नववर्ष २०२६ – संकल्पाचे, प्रगतीचे आणि विश्वासाचे!
2026

अन्यायाविरुद्ध आवाज आणि जनसामान्यांचा विश्वास असलेल्या 'दैनिक विदर्भ केसरी' परिवारातर्फे सर्व वाचक, जाहिरातदार आणि हितचिंतकांना नवीन वर्षाच्या लक्ष-लक्ष शुभेच्छा! हे नवीन वर्ष आपल्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्य घेऊन येवो. आपल्या प्रेमाच्या जोरावर आम्ही जनसेवेचे हे व्रत अविरत सुरू ठेवू.






अमोल नरेश कंटाळे
(मालक, प्रकाशक व संपादक - दैनिक विदर्भ केसरी)



कुणाल मारोतराव गायकवाड
व्यवस्थापक
दैनिक विदर्भ केसरी

# राज्यातील बसस्थानक स्वच्छतेसाठी दर १५ दिवसांनी विशेष मोहीम

▸विदर्भ केसरी। मुंबई :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर, बसस्थानक परिसरात तसेच प्रशासकीय इमारतींमध्ये दर १५ दिवसांनी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात तसेच एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील



बैठक व्यवस्था, फरशी, भिंती, काच, शौचालये, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे, कार्यालयीन कक्ष आदींची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. साचलेला कचरा, अनावश्यक झाडे-झुडपे, जाहिरातींचे फलक, जाळी-जमट यांचे निर्मूलन करून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व नीटनेटका केला जाणार आहे.

कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डबे उपलब्ध करून कच-याचे योग्य प्रकारे वर्गीकरण व विल्हेवाट लावली जाणार असून प्रवासी व कर्मचा-यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या अभियानासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक तसेच एसटीचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

प्रत्येक बसस्थानकावर या मोहिमेची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल, याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. दर १५ दिवसांनी होणा-या या स्वच्छता मोहिमेमुळे एसटी बसस्थानके अधिक स्वच्छ, आरोग्यदायी व प्रवाशांसाठी आनंददायी ठरणार असून प्रवासी सेवेमध्ये गुणवत्तावाढ होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## वरूड तालुक्यात पुन्हा धर्मांतरणाचा प्रयत्न

**▸विदर्भ केसरी। वरूड,**

तालुक्यातील बेनोडा पोलिस ठाणे हद्दीतील पडसोडा गावात हिंदू धर्मातील अंकुश भीमराव बोरवार याला १९ जूलै रोजी ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी जबरदस्ती करण्यात आली होती. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या या धर्मांतरणाचा भांडाफोड झाल्यानंतर २० जुलैला याप्रकरणी तक्रार करण्यात आली होती. परंतु, याप्रकरणी बेनोडा पोलिसांनी दुर्लक्ष केल्याने २५ जुलै रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने बेनोडा पोलिस ठाण्यावर धडक देऊन ठाणेदार विवेक देशमुख यांना निवेदन दिले होते. असाच प्रकार ३० डिसेंबर रोजी पुन्हा बेनोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने सकल हिंदू समाज आक्रमक झाल्याचे पहायला मिळाले.



# अमरावतीत भाजपातले असंतुष्ट संतापले

**▸विदर्भ केसरी। अमरावती,**

**उमेदवारी नाकारल्याने व इतर पक्षातून आलेल्यांना उमेदवारी दिल्याने भाजपमधील असंतुष्टांनी बुधवारी दुपरी छाननीदरम्यान राजापेठ झोन कार्यालयासमोर चांगलाच तमाशा केला.**



संतप्त कार्यकर्त्यांनी भाजपचे निवडणूक प्रमुख जयंत डेहनकर, प्रवक्ते शिवराय कुळकर्णी व दिनेश सुर्यवंशी यांच्याशी बाचाबाची केली. संतप्त कार्यकर्त्यांचा रोष बघून अखेर या नेत्यांनी तेथून निघून जाणेच पसंत केले.

झोन कार्यालयात बुधवारी उमेदवारी अर्जांची छाननी सुरू होती. काही अर्जांवर आक्षेप घेण्यात आल्याने व अपक्ष उमेदवारी दाखल करणाऱ्यांनी त्यांचे अर्ज मागे घ्यावेत, अशी समजूत घालण्यासाठी जयंत डेहनकर, दिनेश सुर्यवंशी व शिवराय कुळकर्णी राजापेठ झोन कार्यालयात आले होते. यादरम्यान तिथे उपस्थित असलेले संगम गुप्ता, सचिन डाके यांनी चांगलाच संताप व्यक्त करीत या नेत्यांना धारेवर धरले. प्रभाग क्रं. ११ फ्रेजरपुरा - रुख्मिणीनगर येथून भाजपने नवख्याला आणि प्रभाग क्रं. १२ स्वामी विवेकानंद - बेलपुरा येथून काँग्रेसचे माजी नगरसेवक प्रदीप हिवसे यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. पक्षाच्या मुळ व निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून बाहेरच्यांना उमेदवारी दिल्याचा आरोप करीत त्यांनी संताप व्यक्त केला. त्यामुळे तिथे काही वेळ चांगलाच तणाव निर्माण झाला होता. परिस्थिती बघून भाजपाच्या तिनही नेत्यांनी संतप्त कार्यकर्त्यांना राजापेठ येथील भाजपा कार्यालयात येण्यास सांगून तेथून काढता पाय घेत गराड्यातून सुटका करून घेतली. इकडे भाजप कार्यालयात पोहोचलेल्या कार्यकर्त्यांना काही वेळ समजविले. त्यानंतर नेते मंडळी निघून गेली.

### //शक्ती महाराजांसोबत शाब्दिक वाद

**■ संतप्त भाजपा कार्यकर्त्यांसोबत आलेले शक्ती महाराज यांनीही तीव्र शब्दात भावना व्यक्त करण्यास सुरूवात केली. त्यामुळे वातावरण आणखीनच तापू लागले. ते भाजपावर आगपाखड करीत असताना प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी त्यांना तुमचा भाजपसोबत काय संबंध?, अशी विचारणा करून प्रत्यूत्तर देण्यास सुरूवात केली. त्यांचा आवेश बघून शक्ती महाराज यांनी स्वतःला आवर घातला.**

### काँग्रेसीला उमेदवारी दिल्याचा संताप

**■ गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही भाजपमध्ये काम करीत आहोत. हिंदुत्वासाठी विविध आंदोलनात सहभागी झाल्याने कोर्ट केसेस आमच्यावर दाखल आहेत. प्रत्येक निवडणुकीतही पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करीत आलोत. महापालिका निवडणुकीत उमेदवारी मिळावी एवढीच माफक अपेक्षा केली होती. निष्ठावंताना डावलून मोदींना शिवीगाळ करणाऱ्या काँग्रेसींना उमेदवारी देण्याचे काम केल्या गेले. त्याचा हा राग असल्याचे भाजपा कार्यकर्ते संगम गुप्ता यांनी सांगितले.**

## पाण्याची टाकी 'ओव्हरफ्लो' : पाण्याचा प्रचंड अपव्यय

**▸विदर्भ केसरी। पुसद,**




शहरातील काही भागात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना रांगा लावाव्या लागत असताना, दुसरीकडे शहराच्या मध्यवर्ती भागात शुद्ध पेयजल अक्षरशः रस्त्यावर वाहत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

पुसद नगरपालिकेच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभाराचे हे जिवंत उदाहरण सध्या टिळकनगर परिसरात पहायला मिळत आहे. टिळकनगर येथे असलेली तब्बल 20 लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी गेल्या तीन दिवसांपासून रात्रीच्या वेळेस सातत्याने ओव्हरफ्लो होत आहे. टाकी भरल्यानंतर पंपिंग तत्काळ बंद करणे अपेक्षित असताना, संबंधित कर्मचारी आणि अधिकारी मात्र नेहमीप्रमाणे गाफील असल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी, शुद्धीकरण प्रक्रिया पूर्ण झालेले मौल्यवान पेयजल रस्त्यावरून खळाळत वाहत असून, मोतीनगर बगिच्याच्या समोरील संपूर्ण रस्ता जलमय झाला आहे. पंपिंग पूर्ण झाल्यानंतर टाकीवर नियुक्त कर्मचाèयांनी वेळीच सूचना देणे व पंप बंद करणे ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेला हा प्रकार पाहता, नगर प्रशासनाला पाण्याची किंमत आणि नागरिकांच्या गरजांशी काहीही देणेघेणे नसल्याचे स्पष्ट होते. शुद्ध पेयजलाचा असा उघड अपव्यय सुरू असताना प्रशासन मात्र गाढ झोपेत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, या प्रकाराबाबत गृहनिर्माण सोसायटीचे अध्यक्ष रवी देशपांडे यांनी पाणीपुरवठा अभियंता माधव पाटील यांच्याशी संपर्क साधून गंभीर बाब निदर्शनास आणून दिली. माहिती देऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, ही बाब अधिक संतापजनक आहे. शहरात सध्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष पदारूढ व्हायचे आहे तर मुख्याधिकारी अतुल पंत यांचे अमरावती येथे स्थानांतरण झाल्याने पुसद नगरपालिकेला सध्या 'वालीच नाही' अशी अवस्था निर्माण झाली आहे. एकीकडे तहानलेले नागरिक आणि दुसरीकडे प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे वाहून जाणारे पाणी, हा विरोधाभास पुसद नगरपालिकेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. या प्रकाराबद्दल शहरातील नागरिकांत तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त होत आहे.

## रामू पवार यांचे निधन

**▸विदर्भ केसरी। दिग्रस,**



दिग्रस शहराच्या सामाजिक, क्रीडा व सार्वजनिक जीवनात आपल्या कर्तृत्वाची अमीट छाप उमटविणारे, सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते रामू पवार यांचे मंगळवार 31 डिसेंबरला मध्यरात्री दीर्घ आजाराने निधन झाले. ते 87 वर्षांचे होते.

कबड्डी क्षेत्रात त्यांनी गाजविलेल्या उल्लेखनीय कर्तृत्वाची दखल घेत राज्य शासनाने त्यांना प्रतिष्ठित शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित केले होते. खेळाच्या मैदानावर त्यांनी जिद्द, शिस्त व संघर्षाचे जे संस्कार रुजविले, तेच संस्कार त्यांनी सामाजिक व सार्वजनिक जीवनातही अखंडपणे जपले. सामाजिक व राजकीय जीवनात त्यांनी अनेक महत्त्वाची पदे भूषविली. सामान्य सफाई कामगार ते सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) असा त्यांनी केलेला प्रेरणादायी प्रवास आज कष्टकरी वर्ग, युवक व वंचित समाजघटकांसाठी दिशादर्शक ठरतो. बुधवार, 31 डिसेंबरला दुपारी 3 वाजता येथील हिंदू मोक्षधामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे तीन मुले, दोन मुली आणि मोठा परिवार आहे.

## जगदीश गुप्तांचा शिंदेसेनला 'रामराम'

**▸विदर्भ केसरी। अमरावती,**



सर्व राजकीय पक्ष सारखेच आहेत. या पक्षांमध्ये नेत्यांच्या समोर मुजरा केल्याशिवाय कोणत्याही कार्यकर्त्यांचे भले होत नाही, येथेही हीच परिस्थिती बघितल्याने निराश झालो. माझ्यासोबत अनेक 'कमिटमेंट' करण्यात आल्या, त्या काही वैयक्तिक नव्हत्या. ज्या लोकांनी मला अनेक वर्षांपासून साथ दिली, त्यांच्यासाठी मी या 'कमिटमेंट' स्वीकारल्या होत्या. पण, बोलणी झाल्यानंतर लगेच गोष्टी बदलत होत्या. पक्षात प्रवेश घेतल्यापासून ते आतापर्यंत वारंवार हे होत असल्याने आपण शिवसेना पक्ष ( शिंदे गट) सोडण्याचा निर्णय घेतला असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आपण पक्षसदस्यत्वाचा राजीनामा पाठवला आहे, असे माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता यांनी मंगळवारी सकाळी पत्रकार परिषदेत जाहीर केले.

जगदीश गुप्ता पुढे म्हणाले, कोणत्याही राजकीय पक्षावर माझा विश्वास राहिलेला नाही. १९९० च्या काळात राजकारणामध्ये जी 'व्हीआयपी' संस्कृती निर्माण झाली होती, ती मोडून काढण्यासाठी मी तेव्हा राजकारणात आलो होतो. आताही फोफावत असलेल्या या व्हीआयपी संस्कृतीला तोडण्यासाठी मी शिंदे गटात प्रवेश घेतला होता. १९९० ते २००० पर्यंत राजकीय नेत्यापर्यंत पोहोचण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज पडत नव्हती. पण, नंतर ती परंपरा तुटली. त्यामुळे मी विधानसभा निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. तेव्हीही गडबड झाली. मी पराभूत झालो. त्यानंतर, कार्यकर्त्यांसाठी मी सक्रीय राजकारण करण्याचा निर्णय घेतला. पण, मी 'आऊट डेटेड' राजकारणी झालो आहे. आजच्या राजकारणात माझ्यासारख्या कार्यकर्त्याला स्थान नाही. त्यामुळे आता कोणत्याही पक्षात जायचे नाही, हा निर्णय मी घेतला आहे.

## कृषि महाविद्यालय, उमरखेडच्या 'रासेयो' विशेष निवासी शिबिराचे पोफाळी येथे उत्साहात उद्घाटन

**▸विदर्भ केसरी। उमरखेड**



श्री शिवाजी शिक्षण संस्था, पुसद द्वारा संचालित आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला संलग्नीत कृषि महाविद्यालय, उमरखेडच्या वतीने मौजे पोफाळी (ता. उमरखेड) येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३० डिसेंबर २०२५ ते ०५ जानेवारी २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या शिबिराचे उद्घाटन मंगळवारी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

शिबिराचे उद्घाटन विद्यापीठ कार्यक्रम समन्वयक (रासेयो) सौ. मंजुषा देशमुख यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एस. के. चिंतले होते. प्रमुख पाहुणे, मा. श्री. सुरेश शिंदे, पोलीस उपनिरीक्षक पोफाळी यांची विशेष उपस्थिती लाभली, सरपंच मा. सौ. रेखाताई स. क्षीरसागर, उपसरपंच मा. सौ. मनिषा स. पायघन यांची उपस्थिती होती. याप्रसंगी व्यासपीठावर पोलीस पाटील श्री. माधवराव गुंढारे, श्री. संतोष क्षीरसागर, जि.प. शिक्षक श्री. अरुण ठाकरे, सेवानिवृत्त अभियंता श्री. राजूभाऊ क्षीरसागर, श्री. प्रसाद नारायणराव पतंगराव तसेच महाविद्यालयाचे डॉ. एस. बी. पवार, डॉ. एस. बी. सोळंके, श्री. वाय. एस. वाकोडे कु. संगीता शिंदे आणि श्री ए.के. गाडेकर उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. एस. बी. पवार यांनी शिबिराच्या नियोजित उपक्रमांची माहिती दिली. या ७ दिवसांच्या कालावधीत रासेयो कार्यक्रम अधिकारी श्री. व्ही. बी. शिंदे यांच्या मार्गदर्शनात ४० स्वयंसेवकच्यावतीने ग्रामस्वच्छता, रक्तदान व रक्तक्षय तपासणी, महिला सक्षमीकरण, पटबंधारे बांधणे, शोषखड्ड्यांचे महत्त्व, मतदान जनजागृती अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, नशामुक्ती कार्यशाळा, सेंद्रिय शेती, आणि जलसंधारण यांसारख्या विषयांवर काम करणार आहेत. तसेच कृषी प्रदर्शनी व सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटक सौ. मंजुषा देशमुख यांनी तरुण पिढीमध्ये राष्ट्रसेवेची भावना निर्माण होण्यासाठी अशा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित केले. युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राच्या रचनात्मक कामासाठी व्हावा, असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य चिंतले यांनी शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला पोफाळी येथील ग्रामस्थ, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी रासेयो चमू परिश्रम घेत आहे.

# 'विद्वान' आमदार, पण निर्णय 'किंगमेकर'चे

### उमरखेडच्या राजकारणात शिष्टाचाराला हरताळ! आमदारकीची प्रतिष्ठा पणाला; उच्चविद्याविभूषित लोकप्रतिनिधी ' किंगमेकरच्या' दावणीला.. ?

**▸विदर्भ केसरी।यवतमाळ**



राजकारणात पद आणि प्रतिष्ठा ही जनतेने दिलेल्या कौलावर अवलंबून असते. मात्र, उमरखेड विधानसभा मतदारसंघात सध्या एक वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. मतदारसंघाचे विद्यमान आमदार हे उच्चविद्याविभूषित असूनही, त्यांचे सर्व घटनात्मक अधिकार एका 'स्वयंभू किंगमेकर'च्या दावणीला बांधले गेल्याची चर्चा आता जनमानसात उघडपणे होऊ लागली आहे. आमदारांनी आपल्या अधिकारांकडे सदसद्विवेक बुद्धीने पाहण्याची वेळ आली आहे, अन्यथा त्यांच्या राजकीय अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

लोकशाहीमध्ये आमदाराचे स्थान हे सर्वोच्च असते. कोणत्याही शासकीय कार्यक्रमात, भूमिपूजनात किंवा अधिकृत फलकावर आमदाराचे नाव आणि स्थान अग्रक्रमाने असणे हा प्रोटोकॉल (शिष्टाचार) आहे. परंतु, उमरखेडमध्ये या नियमांना हरताळ फासला जात आहे. मतदारसंघातील विकासकामांच्या फलकांवर आमदारांपेक्षा या तथाकथित 'किंगमेकर'चाच फोटो आणि नाव मोठे असते. आमदारांच्या या हतबलतेमुळे, "मतदारसंघाचे प्रतिनिधित्व नक्की कोण करतंय?" असा संभ्रम जनतेत निर्माण झाला आहे.

विद्यमान आमदार हे उच्चशिक्षित आहेत, त्यांच्याकडून जनतेला अभ्यासू आणि स्वतंत्र निर्णयांची अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात ते या स्वयंभू किंगमेकरच्या हातातील 'बाहुले' बनल्याचे दिसत आहे. आमदारांच्या या दुर्बळ भूमिकेचा पूर्ण फायदा संबंधित नेता उचलत असून, स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी आणि आपले वजन वाढवण्यासाठी तो आमदारांच्या अधिकारांचा वापर करत आहे. आमदारांनी स्वतःची विवेकबुद्धी गहाण ठेवून अशा प्रकारे वागणे हे त्यांच्या पदवीला आणि पदाला न शोभणारे असल्याची टीका होत आहे.

नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत जनतेने या 'एकाधिकारशाही'ला सणसणीत चपराक दिली आहे. ज्या नेत्याच्या शब्दाबाहेर आमदार जात नाहीत, त्याच नेत्याला स्वतःच्या पत्नीलाही निवडून आणता आले नाही. यावरून हे स्पष्ट होते की, जनता आता या 'दुहेरी' कारभाराला कंटाळली आहे. आमदारांनी जर वेळीच सावध होऊन आपल्या कर्तव्याची आणि अधिकारांची जाणीव ठेवली नाही, तर आगामी काळात त्यांनाही जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल.

"आमदार हे जनतेचे प्रतिनिधी असतात, कोणत्याही व्यक्तीचे खासगी सेवक नव्हे. पद आणि अधिकार हे लोककल्याणासाठी मिळाले आहेत, ते दुसऱ्याच्या चरणी अर्पण करण्यासाठी नाहीत. आता तरी आमदारांनी आत्मपरीक्षण करून स्वतंत्रपणे कारभार करावा, अशी अपेक्षा सामान्य नागरिक व्यक्त करत आहेत."

**■ विद्यमान आमदारांकडून जनतेला अभ्यासू आणि स्वतंत्र निर्णयांची अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात ते या स्वयंभू नेत्याच्या हातातील 'बाहुले' बनल्याचे दिसत आहे. आमदारांच्या या दुर्बळ भूमिकेचा पूर्ण फायदा संबंधित नेता स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी करत असून, आमदारांनी स्वतःची विवेकबुद्धी गहाण ठेवणे हे त्यांच्या पदवीला आणि पदाला न शोभणारे असल्याची टीका राजकीय वर्तुळात होत आहे.**

## अग्रलेख

# पुढच्या पावलाची ऊर्जा!

*या विश्वामध्ये पृथ्वीसारखे सौंदर्य, सजीवता आणि वैविध्यता असलेला आणखी कोणी ग्रह, तारा असेल की नाही, माहीत नाही. पण पृथ्वीवरचा प्रत्येक सजीव हा भाग्यवानच म्हटला पाहिजे. कारण, अन्यत्र कोठेही कोणाच्याही वाटणीस आलेले नाही असे जीवन, म्हणजे जगणे अनुभवण्याचे भाग्य त्याला मिळाले आहे. तो कोणत्याही रूपाने जन्माला आलेला असला, तरी त्याच्या आयुष्यावर त्याचे नेहमीच प्रेम असते आणि आपल्या वाटणीला आलेले आयुष्य जपण्यासाठी तो सदैव धडपड करत असतो. सजीवांचे वास्तव्य असलेल्यांच्या या जगात माणसाचा जन्म लाभणे हे दैवदुर्लभ भाग्य मानले जाते. कारण या सृष्टीमध्ये असंख्य सजीवांना निसर्गाने जन्म दिलेला असला, तरी मनुष्यजीवावर मात्र त्याची विशेष माया आणि मेहेरबानीदेखील आहे. अन्यांच्या जगण्यावर कायमच असुरक्षिततेचे सावट दाटलेले असते आणि त्या सावटाखाली वावरतानाही, सुरक्षित राहण्यासाठी आणि आपल्या वाटणीला आलेल्या जन्माची पालखी वाहण्यासाठी पुढची पिढी तयार करण्यासाठी धडपडणे एवढाच त्या अन्य सजीवांच्या जगण्याचा उद्देश असतो. माणसाचे जगणे मात्र याहून बरेच वेगळे असते. केवळ जन्माला आल्यापासून मृत्यू येईपर्यंतचे आयुष्य म्हणजे जगणे नाही, तर जन्म आणि मृत्यू यांच्या दरम्यानच्या वाटचालीत जे काही आयुष्य वाट्याला आलेले असते, त्याचे सोने करण्यासाठी धडपडणे हे खरे जगणे असते हे माणसाएवढे अन्य कोणाही सजीवास माहीतदेखील नसते. म्हणून माणसाचा जन्म हा अन्य कोणत्याही सजीवाहून श्रेष्ठ मानला जातो, कारण तसे आयुष्य पृथ्वीवरच्या अन्य कोणा अन्य सजीवास लाभलेले नसते आणि पृथ्वीबाहेरच्या विश्वात सजीव आहेत किंवा नाही यांचाच अजून शोध सुरू असल्याने, अन्यत्र कोठे माणसाएवढा प्रगत सजीव सापडण्याची शक्यताही नसते. म्हणूनच, जन्माला आल्यानंतर सुरू होणारा प्रवास हा खरे तर अज्ञाताचा प्रवास आहे हे माहीत असूनही, त्या प्रवासाच्या वाटेवर आनंदाचे मळे फुलविण्याचा माणसाचा प्रयत्न सतत सुरू असतो. कधी कधी त्याचीही स्पर्धा सुरू होऊन आपला मळा अधिक सुशोभित करण्याच्या हट्टापायी अन्यांचे मळे उद्ध्वस्त करण्याची दुर्बुद्धी कोणा एखाद्यास सुचत असेलही, पण कोठेतरी, कोणाचे तरी आनंदाचे मळे फुलविणे हा त्यामागचाही हेतू दुर्लक्षित करता येत नाही. सुखाच्या आणि समाधानाच्या वाटचालीत अनेकदा वेडीवाकडी वळणे लागतात, चढउतार लागतात, कधी चालताना दमछाकही होते. या प्रवासाच्या एखाद्या टप्प्यावर अनेक रात्री अनुभवाव्या लागतात, पण ही रात्र संपली की उद्या पुन्हा नवा सूर्य उगवणार आहे आणि नवा दिवस सुरू होऊन त्याच्यासोबत मिळणारी नवी ऊर्जा घेऊन नव्या उमेदीने पुढचा प्रवास करणार आहोत, हेही प्रत्येकास ठावूक असते. सूर्य मावळला की अंधार पडणार आहे आणि रात्र संपली की अंधारही संपून उजेडाची तिरीप पाहायला मिळणार आहे, या विश्वासाने चालताना अंधारवाटेवरदेखील पावले अडखळत नाहीत आणि मागे हटत नाहीत. पुढे पडणाèया प्रत्येक पावलासोबत कधी सहजपणे, कधी खडतरपणे, कधी एकाकीपणे, तर कधी कुणाच्या आधाराने, प्रवासाची ही अज्ञात वाट चालत राहावी लागते. वाटेवरच्या अडथळ्यांची, वळणांची किंवा चढउतारांची पर्वा न करता चालत राहणे हेच जगणे असते. त्या चालण्याच्या प्रत्येक पावलावर आनंद उधळावा आणि तो एकमेकांसोबत वाटून घ्यावा. यातूनच प्रवास सुखकर होईलच, पण आपल्यासोबत चालणारे, आपल्या आसपासचे अशाच प्रवासातले वाटसरूदेखील आनंदाने पुढची पावले टाकतील आणि जगण्यातील आनंदाच्या अनुभवाने सुखावतील. खरे म्हणजे, या वाटचालीसोबत पाठीवर घेतलेला दिवसाचा भार आपण नेहमीच आनंदाने वाहत असतो. त्या वाटचालीला साथ देणारा सूर्य दररोजच उगवतो आणि मावळल्यानंतर होणाऱ्या रात्रीचा अंधार संपून नवा दिवस सुरू होणार याची आपल्याला खात्रीही असते. म्हणूनच, कोणताही एखादा मावळता दिवस किंवा कोणताही एखादा नव्याने उगवणारा दिवस निसर्गाच्या नजरेत सारखाच असतो. त्यावर वेगळेपणाचा साज आपण, माणसांनी चढविलेला असतो. कारण त्या वेगळेपणाचा साज चढवून सजविला गेलेला दिवस वाटचालीतील आनंदाला नवी उमेदही देत असतो. संस्कृतीच्या संस्कारांनी संपन्न झालेल्या समाजाच्या जगण्याच्या प्रत्येक दिवसाची सुरुवातच पृथ्वीच्या स्तुतिस्तोत्राने होते आणि मावळल्यानंतरच्या नव्या दिवसाच्या प्रतीक्षेचा अंधारलेला काळदेखील पृथ्वीची प्रार्थना करून सरतो, त्यांना अशा एखाद्या दिवसाच्या वेगळेपणाचे अप्रूप असतेच असे नाही. पण जेव्हा आनंद वाटून घ्यायचा हे ठरलेलेच असते, तेव्हा जगाच्या जल्लोषाकडे त्रयस्थपणे पाहात राहण्याहूनही, त्यांच्या आनंदाची काही फुले आपल्या आसपासही उधळली गेली तर त्यात गैर काहीच नाही. म्हणूनच, नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येला, काही काळासाठी तरी जुन्याचा विसर पडतो.*

*ते सहजपणे होत जाते. कारण, ज्याला जगभरातील मनुष्यमात्राने नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येचा साज चढविलेला असतो, त्या वर्षअखेरीचा दिवस हा केवळ जल्लोषाचा नसतो. सरलेल्या काळातील कडू गोड आठवणींतून समाधानाचे धागे वेचून ते एकत्र करण्याचा व नव्या वाटचालीच्या वस्त्रामध्ये त्या धाग्यांची नक्षी सजवून पुढची वाटचाल सजविण्याचा सण म्हणून अशा दिवसाकडे पाहावयास हवे. अनुभवांनी भरलेल्या प्रवासातले एक पाऊल पार पडले, याचा आनंद साजरा करावा आणि पुढच्या पावलाची उमेद गाठीशी बांधावी, हाच त्या दिवसावर दाटलेल्या वेगळेपणाच्या जाणिवांचा हेतू असावा. आपल्याला पुढेच चालावयाचे आहे, हे नक्की असल्याची खात्री झाली, की पुढचा प्रवास आनंदाचा कसा होईल याची गणिते आखता येतात. तसे केले तरच पुढच्या प्रवास सोपा होईल, ही खूणगाठ मनाशी पक्की असणे कधीही चांगलेच!*

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajptpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

GOOD MORNING
# कॉटनसिटी



!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## यवतमाळचा पारा १०.६ अंश

■ यवतमाळ : उत्तरेकडून येत असलेल्या थंडी वाऱ्यामुळे जिल्ह्यातील तापमानात मोठी घट होत आहे. बुधवारी पहाटे १०.६ अंश इतक्या तापमानाची नोंद झाली आहे. गोंदिया व नागपूर नंतर सर्वात कमी तापमान अमरावती जिल्ह्यात राहिले आहे. दिवसाचाही पारा २९.४ अंशावर आला आहे. थंडीचा प्रकोप दिवसेंदिवस वाढत आहे. सलग थंडीची लाट असल्याने गारठा वाढला आहे. याचा परिणाम दैनंदिन कामकाजावर होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# ...तर सामाजिक परिवर्तन शक्य!

## अनिल शिंदे : गाडगेबाबांच्या विचारातून फुले-आंबेडकर समजणे आवश्यक

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची विचारधारा आत्मसात करून समाजात मूलभूत सामाजिक परिवर्तन घडवून आणता येईल. गाडगेबाबा हे चालते-बोलते विद्यापीठ होते. त्यांच्या विज्ञानवादी आणि मानवतावादी दृष्टिकोनातून जर महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा बहुजन समाजाने समजून घेतली, तर समाजाच्या एकत्रीकरणाला फारसा वेळ लागणार नाही, असे प्रतिपादन अनिल शिंदे (अकोला) यांनी केले.

मानवतावादी संत गाडगेबाबा विचार मंच, यवतमाळ यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात 'गाडगेबाबांचा विज्ञानवादी संदेश आणि आजचा समाज' या विषयावर ते बोलत होते.

अनिल शिंदे यांनी गाडगेबाबांच्या विचारांचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, गाडगेबाबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात माणूस ओळखताना दगडधोंड्यांपासून दूर राहण्याचा संदेश दिला. ते म्हणाले, "गाडगेबाबा हे विषमतावादी व्यवस्थेवर प्रहार करणारे पुरोगामी विचारांचे दैवत आहेत. त्यांच्या विचारांच्या माध्यमातून फुले-आंबेडकरी विचारधारा समजून घेतली, तर बहुजन समाजाच्या एकीकरणासाठी ठोस प्रयत्न करता येतील."

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्वभाषिक धोबी महासंघ, विदर्भ विभागाचे उपाध्यक्ष चंद्रशेखर केळतकर होते. प्रमुख उपस्थितीत प्रकाश शिरसागर, शरद टेंभेकर, रुपेश शहाकार (कारंजा, जि. वाशिम), श्रीकृष्ण टपके, वासुदेवराव मोतीकर, रमेश टेंभेकर, प्रशांत कडूकर, सुधीर अडेकर, ज्ञानेश्वर सावरकर, राजकोंडावार सर, वैभव घोलप, सेवतकर साहेब, भास्कर सावरकर, प्रकाश खीरकर, पिंपळकर साहेब, हेमंत शेंदुरकर, रवी बेनकर व सोनटक्के साहेब आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत सावरकर यांनी केले. सूत्रसंचालन व मुख्य आयोजन भानुदास केळझरकडे यांनी केले. आभार प्रदर्शन ॲड. वैभव एडके यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशिष धोंगडे, शंकर अनिवार, संजय धोंगडे, सुभाष शिरसागर, विठ्ठल शिरसागर, प्रभाकर क्षीरसागर, संदीप कापसे, नरेंद्र भाजपाले, सचिन पत्रकार, प्रकाश नाईकवाड, सुरज काळे, अभय धोंगडे, गजानन भाजपाले, अशोक गवळी व प्रफुल किरवटकर यांनी विशेष सहकार्य केले.

### अन्यायाकडे वेधले लक्ष

■ यावेळी अनिल शिंदे यांनी धोबी समाजावर होत असलेल्या अन्यायाकडे लक्ष वेधले. महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी धोबी समाज अनुसूचित जाती (SC) प्रवर्गात होता. मात्र, महाराष्ट्र निर्मितीनंतर त्याचा समावेश इतर मागासवर्गीय (OBC) प्रवर्गात करण्यात आला. हा निर्णय धोबी समाजावर झालेला मोठा अन्याय असल्याचे त्यांनी नमूद केले. देशातील १८ राज्यांमध्ये धोबी समाज अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट असल्याने, महाराष्ट्रातही तो पुन्हा SC प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली. या लढ्यासाठी बहुजन समाजाने एकत्र येऊन सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## दारव्ह्यात मोकाट कुत्र्यांचा हैदोस

**▸विदर्भ केसरी। दारव्हा,**

शहरात मोकाट कुत्र्यांनी धुमाकूळ घातला असून लहान मुलांसह अनेकांना चावा घेऊन हल्ले केले आहे. त्यांच्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. दारव्हा शहरातील बहुतेक भागात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. ही मोकाट कुत्रे रस्त्याच्या मधोमध बसल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण करतात. त्यामुळे अपघाताची शक्यता राहते. शिवाय रस्त्याने जाणाèया, येणाèया लहान मुलांना, शाळकरी मुलांना चावा घेतात. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे गरजेचे झाले आहे.विशेष म्हणजे, दारव्ह्यातील जैन मंदिर, गणेश ज्वेलर्स, मानपूरा चौक तसेच अंबादेवी मंदिराकडे जाणारा रस्ता या भागात मोकाट कुत्रे मोठ्या प्रमाणात आहेत. विशेष म्हणजे, हा रस्ता अतिशय रहदारीचा आहे. त्यामध्ये हे मोकाट कुत्रे त्रास देतात. त्यासंबंधी अनेकवेळा तोंडी तक्रारी झाल्या, परंतु त्यावर कार्यवाही झाली नाही. आता हा विषय महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने हाती घेतला असून मनसेचे तालुकाध्यक्ष लाला पांडे यांनी मुख्याधिकाèयांना निवेदन दिले आहे. या संबंधात बंदोबस्त न झाल्यास आंदोलनाची तयारी दर्शविली आहे.

## संक्षिप्त...

### बहिरम यात्रेत ६ जानेवारीपासून हरिनामाचा गजर

**▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर:-**



श्री बहिरमबाबा संस्थान यांच्या वतीने व ह.भ.प. संजय महाराज अलोणे, श्रीक्षेत्र आळंदी यांच्या मार्गदर्शनामध्ये श्री क्षेत्र बहिरम येथे गरुड पुराण, विचार सागर प्रवचनमाला व कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज बावस्कर यांच्या वाणीमधून दुपारी १ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत गरुड पुराण कथेचे वाचन होणार आहे.त्यानंतर सायंकाळी ४.३० ते ५. ३० वाजेपर्यंत विचार सागर या ग्रंथावर ह.भ.प. सोपान महाराज पाहणे प्रवचन करणार आहेत. दररोज सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.६ जानेवारी रोजी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज बावस्कर, ७ जानेवारी रोजी ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर, ८ जानेवारी रोजी ह.भ.प. कान्होबा महाराज देहूकर यांची कीर्तन सेवा होणार आहे. ९ जानेवारी रोजी ह.भ.प. राजेंद्र महाराज चोरडिया, १० जानेवारी रोजी ह.भ.प. प्रभाकरदादा बोधले महाराज तर ११ जानेवारी रोजी ह.भ.प. निवृत्ती महाराज नामदास यांची कीर्तन सेवा होणार आहे. १२ जानेवारी रोजी ह.भ.प. संजय महाराज अलोणे यांचे कीर्तन होईल. १३ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. भागवत महाराज शिरवडकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्याचप्रमाणे दररोज सकाळी ५ ते ६ या वेळेत काकड आरती, सकाळी ७ ते ८ या वेळेतपंचदशी आणि सकाळी ९ ते ११ या वेळेत गाथा भजन होईल.

### येवदा परिसरातील जंगलात बिबट व दोन बछडे असल्याची नागरिकांमध्ये अफवा

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी रामेश्वर माकोडे.**



दर्यापूर तालुक्यातील येवदा गावात. दर्यापूर रस्त्याने व इटकी रस्ता भागडी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जंगलात बिबट व दोन बछडे असल्याची नागरिकांमध्ये चांगली चर्चा रंगत आहे याच्या भीतीपोटी मजूर कामाला जात नसून शेतकऱ्यांचे कपाशीचे नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे अनेक शेती मधला कापूस व्यसनाकरिता ह्या रस्त्याने मजूर मिळत नाही परंतु काही सुज्ञ शेतकऱ्यांनी व नागरिकांनी सांगितले की हे निवड अफवा असून बिबट व दोन बछडे असं काहीच नसल्याचे सांगण्यात येत आहे कारण असं काही असतं तर एखाद्या शेतकऱ्याला आढळला किंवा दिसले असते असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातला रात्रीचा कापूस सुद्धा वेचून जात आहे यामुळे चोरीचे प्रमाण जास्त वाढल्याचे दिसून येत आहे कारण मजुराला भीती दाखवायची व रात्रीच्या कापसाच्या चोऱ्या करायच्या अशा प्रकार ह्या येवदा गावातील भागडी ह्या जंगलात चालू आहे आधीच मजुराचे हाताला काम नाही त्यात मजूर वर्गाला अशी भीती दाखवल्या जात आहे मजुरांनी करायचं तरी काय असा प्रश्न निर्माण झालाय आहे तरी यावर गावातील मजूर वर्गांनी व शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये असे सुज्ञ शेतकऱ्यांकडून नागरिकांकडून सांगण्यात येत आहे

# एसटी महामंडळाने प्रवाशांना दिला 'शॉक'

## अकोला मार्गावर 'शिवाई'चा भरणा, सवलतधारक प्रवाशांची मात्र कोंडी!

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) पर्यावरणपूरक पाऊल उचलत अकोला मार्गावर अत्याधुनिक 'शिवाई' इलेक्ट्रिक बसेसची संख्या वाढवली आहे. मात्र, प्रशासनाचा हा निर्णय सर्वसामान्य आणि सवलतधारक प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहे. साध्या बसच्या तुलनेत शिवाईचे भाडे अव्वाच्या सव्वा असल्याने आणि साध्या बसेसची संख्या घटल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

अकोला ते मूर्तिजापूर या प्रवासासाठी शिवाई बसचे तिकीट चक्क ११२ रुपये आकारले जात आहे. विशेष म्हणजे, याच मार्गावर धावणाऱ्या साध्या बसेसचे भाडे यापेक्षा कितीतरी कमी आहे. केवळ ४५-५० किलोमीटरच्या अंतरासाठी १०० रुपयांहून अधिक मोजावे लागत असल्याने रोजची ये-जा करणाऱ्या नोकरदार आणि व्यावसायिकांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे.

सवलतधारकांचा हिरमोड, 'नावात सवलत, खिशातून जास्त पैसे' शासनाने महिलांना ५० टक्के सवलत महिला सन्मान योजना, आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत किंवा सवलतीच्या दरात प्रवास देण्याचे धोरण राबवले आहे. मात्र, अकोला मार्गावर आता बहुतांश 'शिवाई' बसेसच उपलब्ध असल्याने प्रवाशांना नाईलाजाने याच बसमध्ये चढावे लागत आहे. शिवाईच्या मूळ तिकिटाचा दरच जास्त असल्याने, सवलत मिळूनही द्यावी लागणारी रक्कम ही साध्या बसच्या पूर्ण तिकिटापेक्षाही जास्त भरत आहे. यामुळे सवलतीचा खरा लाभ प्रवाशांना मिळेनासा झाला आहे. साध्या बसेसची प्रतीक्षा कायम प्रवाशांच्या तक्रारीनुसार, डेपोतून सुटणाऱ्या साध्या बसेसची संख्या जाणीवपूर्वक कमी केली आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तासनतास थांबूनही साधी बस मिळत नाही आणि शिवाई बसेस एकामागे एक धावत आहेत.

### प्रवाशांच्या प्रमुख मागण्या

■ अकोला-मूर्तिजापूर मार्गावर साध्या लालपरी बसेसची संख्या तत्काळ वाढवावी, शिवाई बसच्या तिकीट दराचा फेरविचार करून ते सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणावे, सवलतधारक प्रवाशांना स्वस्त प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून द्यावा

■ शासनाने सवलत दिली खरी, पण आता साध्या बसच रस्त्यावरून गायब झाल्या आहेत. ११२ रुपये देऊन दिव्यांग बांधवान परवडणारे भाडे नाही व या शिवाई बस मध्ये दिव्यांगांना कोणतीच सवलत नाही,प्रवास करणे सामान्य माणसाला परवडणारे नाही. महामंडळाने केवळ नफ्याचा विचार न करता प्रवाशांच्या सोयीचा विचार करावा.

-सुधीर कडू. विभागीय अध्यक्ष
दिव्यांग सुशिक्षित बेरोजगार संघटना एक त्रस्त प्रवासी, मूर्तिजापूर.

# मृत अवस्थेत वाघ आढळला



**▸विदर्भ केसरी। हिंगणघाट :**

तालुक्यातील सेलू मुरपाड ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वैजापूर रीट गावाजवळील नाल्यामध्ये मृत्यू अवस्थेत वाघ आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सकाळच्या सुमारास नागरिकांच्या निदर्शनास ही घटना येताच तात्काळ ग्रामस्थांनी याची माहिती संबंधित यंत्रणांना दिली. गावाजवळील नाल्यात वाघाचा मृतदेह दिसून आल्याने भीती आणि कुतूहलाचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वनविभागाने मृत वाघाचा देह आपल्या ताब्यात घेतला असून प्राथमिक पाहणी करण्यात आली आहे. मात्र वाघाच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मृत्यू नैसर्गिक कारणामुळे झाला की अन्य कोणते कारण आहे, याबाबत सध्या तर्कवितर्क सुरू आहेत.

### चौकशी सुरू

■ वनविभागाकडून वाघाच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली असून आवश्यक त्या वैद्यकीय तपासणीनंतर मृत्यूचे खरे कारण समोर येणार आहे. दरम्यान, घटनास्थळी मृत वाघाला पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. वनविभागाने नागरिकांना सुरक्षित अंतर ठेवण्याचे आवाहन करत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.

# मूल्यशिक्षणाविषयी कार्यशाळा संपन्न

**▸विदर्भ केसरी। विजय निखाते**



**पुसद :** युवक मंडळ पुसद द्वारा संचालित स्थानिक मातोश्री पार्वतीबाई नाईक कॉन्व्हेंट स्कूलमध्ये आज दिनांक 31/12/2025 बुधवार रोजी मूल्यशिक्षणविषयी कार्यशाळा संपन्न झाली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रेरणादायी विचारक डॉक्टर श्री. श्रीकांत. एस. पाटील (Director / Head Department of lifelong Learning and Extension) संत गाडगे बाबा अमरावती, विद्यापीठ तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य श्री. बि. एन. खराटे सर उपस्थित होते. याप्रसंगी प्रेरणादायी विचारक डॉक्टर श्री. श्रीकांत पाटील यांनी आपल्या भाषणात सर्वप्रथम शालेय जीवनात मूल्यशिक्षण हे नविन शैक्षणिक धोरण 2020 नुसार अतंत्य महत्वाचा घटक आहे असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, आजकाल मुले मोबाईल चा खूप वापर करत आहेत त्यामुळे मुलांचे मानसिक आरोग्य धोक्यात येत असून मोबाइल चा आवश्यक तेंव्हाच वापर करावा. पुढे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की पालकांचा व गुरुजनांचा आदर करावा तसेच त्यांनी कथेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले ध्येय ठरवून शिस्तीत मार्गक्रमण करत यश प्राप्तीसाठी झटावे हे सांगितले. पुढे ते म्हणाले की सूर्यप्रकाशात जर काचेच्या भिंगाने कागद पेटवायचे असेल तर आधी त्या भिंगाला सूर्याची किरणे एकवटवावी लागतात त्याप्रमाणेच विद्यार्थी दशेत आपल्या ध्येयपूर्तीसाठी अभ्यासासाठी मेहनत करावी लागते मेहनत केल्याने यशस्वी होण्यास कोणीही रोखू शकणार नाही ; असे स्पष्ट करत आपल्या प्रेरणादायी विचारांची सांगता केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी प्रेरित होत टाळ्यांच्या कडकडाटात केला. याप्रसंगी सूत्रसंचालन शिक्षक श्री. बिजू मुंडावरे यांनी तर आभार शिक्षिका सौ. दिपीका खराटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शाळेतील शिक्षिका सौ. प्रीती पोळकट मॅडम व शिक्षक श्री. नितिन नांदेडकर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## क्षुल्लक कारणावरून चाकूने हल्ला

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

अशोक नगर (पाटीपुरा) भागात शेकोटी करण्याच्या कारणावरून वाद होऊन एका १९ वर्षीय तरुणावर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आला. २९ डिसेंबरच्या रात्री फरदिन खान हा घरासमोर शेकोटी करत असताना आरोपी शेख सलमान शेख वहीद (वय २७) याने वाद घातला. वादाचे रूपांतर भांडणात झाले आणि आरोपीने फरदिनच्या पोटात चाकू खुपसून त्याला गंभीर जखमी केले. जखमीच्या आईने, परविन फिरोज खान यांनी दिलेल्या तक्रारीवरून यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा (कलम १०९(१), ३५२ भान्यासं) नोंदवण्यात आला आहे.

# शाळेच्या प्रांगणात रंगल्या जून्या आठवणी

## श्री.वसंतरावनाईक विद्यालय हातगाव येथे माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न.

**▸विदर्भ केसरी। मुर्तिजापूर**



मुर्तिजापुर तालुक्यातील ग्रामीण भागातील नामांकित असलेल्या हातगाव येथील श्री.वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सत्र 1998-99 मध्ये इयत्ता 10 वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा मेळावा दि. 28 डिसेंबर रविवार ला विद्यालयाच्या प्रांगणात अतिशय उत्साहात संपन्न झाला.तब्बल 28 वर्षांनंतर सर्व मित्र मैत्रीणींची भेट झाल्यामुळे हा कार्यक्रम भावनिक ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी.एन.ठाकरे सर तर प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राचार्य अशोक कथलकर सर, माजी प्राचार्य आर.एम.ठाकरे सर , श्रीकृष्ण बोळे सर, डि.एस.बोन्ते सर, जी.एम. इसळ सर,सौ.वानखेडे मॅडम, एम.यु. राठोड सर, डाबेराव सर ,सुषमा चव्हाण मॅडम,संजीवनी गोपकर मॅडम व नरेंद्र फुंडकर हे उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन, महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.अध्यक्ष व सर्व अतिथींचा माजी विद्यार्थ्यांकडून यथोचित सत्कार झाला.

रवींद्र गोपकर राहुल वानखडे विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनातील आठवणी ला उजाळा दिला तसेच शाळेबद्दल व शिक्षकांबद्दल ऋण व्यक्त केले.यानंतर निता कथलकरआणि जया उमाळे या विद्यार्थ्यांनी बहारदार कवितेतुन शालेय आठवणीचे वर्णन केले. बोन्ते सर, आर.एम.ठाकरे सर, बोळे सर,कथलकर सर व अध्यक्ष प्राचार्य ठाकरे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन पंकज कथलकर , सीमा महल्ले व उज्वला राऊत तर आभार प्रदर्शन जयश्री बोळे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता पंकज कथलकर, मंगेश ठाकरे, अविनाश जोगळे, दीपक राखोंडे, दिपक नांदेकर,गजानन व्यवहारे, अनुश्री सीमा महाले, ध्रुव शारदा कथलकर, ज्योती राखोंडे,जया उमाळे, राहुल वानखडे यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमानंतर सर्वांनी पंकज कथलकर यांच्या शेतामध्ये जेवणाचा आस्वाद घेतला.

### मुक श्रध्दांजली

■ त्यानंतर शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व.डॉ. आर.जी.राठोड साहेब व दिवंगत पदाधिकारी व कर्मचारी तसेच अकाली निधन झालेल्या वर्ग मित्रांना मुक श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**पाच महिन्यांपासून संसार उधारीवर** : १०२ रुग्णवाहिका चालकांचे वेतन रखडले, आंदोलनाचा ईशारा

# 'जीवनवाहिनी'चे सारथीच संकटात!

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**




अपघातग्रस्त आणि गंभीर रुग्णांना मृत्यूच्या दाढेतून ओढून रुग्णालयापर्यंत पोहोचवणारे १०२ रुग्णवाहिकेचे चालक सध्या स्वतःच आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडले आहेत. गेल्या पाच महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने जिल्ह्यातील १०२ रुग्णवाहिका चालकांवर उपासमारीची वेळ आली असून, १६ वर्षांच्या प्रामाणिक सेवेनंतरही त्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली आहे.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत १०२ रुग्णवाहिका सेवा अखंड सुरू असून, चालक २४ तास तत्परतेने आपली जबाबदारी पार पाडत आहेत. अपघातातील जखमी, गर्भवती महिला तसेच गंभीर रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचविण्याचे महत्त्वाचे काम हे चालक करीत आहेत. मात्र, सेवा सुरू असताना वेतन थांबले असल्याने चालकांमध्ये नाराजी आहे. चालकांना मिळणारे मानधन अत्यल्प असून, तेही पाच महिन्यांपासून न मिळाल्याने घरखर्च, मुलांचे शिक्षण व वैद्यकीय उपचारांचा भार वाढला आहे. काही चालकांवर कर्ज काढण्याची वेळ आली असून, आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वेतन न मिळाल्याने सवना येथील एका चालकाच्या पत्नीच्या उपचारासाठी इतर चालकांनी आर्थिक मदत जमा केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे चालकांच्या अडचणी अधिकच स्पष्ट झाल्या आहेत.

### मदतीसाठी धावले सहकारी

■ वेतन नसल्याने चालकांची परिस्थिती किती भीषण आहे, याचे उदाहरण सवना येथे पाहायला मिळाले. एका चालकाच्या पत्नीच्या उपचारासाठी पैसे नसल्याने, इतर सर्व सहकाऱ्यांनी स्वतःच्या खिशातून आर्थिक मदत जमा करून उपचार पूर्ण केले. ही हृदयद्रावक घटना प्रशासकीय यंत्रणेच्या संवेदनाशून्यतेवर बोट ठेवणारी आहे.

### प्रशासनाचे मौन

■ या गंभीर विषयावर जिल्हा शल्य चिकित्सक सुखदेव राठोड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. थकीत वेतन तातडीने अदा न केल्यास काम बंद करून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा १०२ रुग्णवाहिका चालक संघटनेने दिला आहे.

# विनापरवाना देशी दारू जप्त ; आरोपी पसार

## हिंगणघाट पोलिसांची दारूबंदी कायद्यान्वये धडक कारवाई

**▸विदर्भ केसरी। हिंगणघाट**




पोलीस स्टेशन हिंगणघाट येथील पथकाने दारूबंदी कायद्यान्वये मोठी कारवाई करत विनापरवाना साठवलेली देशी दारू जप्त केली आहे. पथकाला मुखबिराकडून खात्रीशीर माहिती मिळाली होती की मौजा वाघसावली (ता. हिंगणघाट) येथील गोलु मन्ने हा आपल्या शेतात बेकायदेशीररीत्या देशी दारू साठवून ठेवत आहे.

मा. पोलीस निरीक्षक अनिल राऊत (ठाणेदार, पो. स्टे. हिंगणघाट) यांच्या निर्देशानुसार पथकाने वाघसावली शिवारातील संबंधित शेतात प्रोव्हिजन रेड केली. मात्र पोलिसांची चाहूल लागताच आरोपी पसार झाला. पंचासमक्ष पाहणीदरम्यान शेतातून 90 मि.ली. क्षमतेच्या एकूण 1,200 प्लास्टिक शिश्या (12 खर्ड्यांचे खोक्यांमध्ये) आढळून आल्या. सदर दारूची एकूण किंमत सुमारे ₹ 1,20,000/- असल्याचे पोलिसांनी सांगितले.

जागीच सविस्तर मौका जप्ती पंचनामा करून दारूबंदी कायद्यान्वये आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, सा. मा. अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व सा. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पोलीस कर्मचारी प्रविण बोधाने, स्वप्नील जिवने, सागर सामृतवार व प्रमोद डडमल यांचा समावेश होता.

पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला असून अवैध दारूविक्रीविरोधात अशाच धडक कारवाया पुढेही सुरू राहतील, असा इशारा देण्यात आला आहे.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY
गडचिरोली GOOD MORNING

## 35 कोटी रुपयांच्या सिंथेटिक ट्रॅक, फुटबॉलसह इतर मैदानांची दुरवस्था

यवतमाळ : सुमारे ३५ कोटी रुपयांपेक्षा अधिकचा खर्च करून जिल्हा क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक, फुटबॉलचे मैदान आणि इतर मैदाने तयार करण्यात आली होती. मात्र केवळ देखभाल दुरुस्ती अभावी आता या मैदानांची दयनीय अवस्था झाली आहे. टर्फचे मैदान तर अतिशय खराब झाले आहे. या ठिकाणी खेळाचा सराव करण्यासाठी येणाऱ्या खेळाडूंना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या मैदानाची तातडीने डागडुजी व्हावी अशी मागणी आता क्रीडाप्रेमी करीत आहेत. जिल्हाभरातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा मिळाव्यात यासाठी गोधनी मार्गावरील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये कोरोना काळापूर्वी मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात आली. ३ सप्टेंबर २०१८ रोजी या कामाची सुरुवात झाली होती. त्यात तब्बल ७ कोटी रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यात आला. त्याचप्रमाणे २७ कोटी रुपये खर्च करून ट्रॅकच्या मध्ये हिरव्या गवताचे टर्फ मैदान, बॅडमिंटन, टेबल टेनिस, लॉन टेनिस, बास्केटबॉल, स्केटिंग ही मैदाने आणि परिसरातील सर्व रस्ते तयार करण्यात आले. त्यानंतर मैदानावर फ्लड लाइट लावण्यात आले. त्यासाठी १.३० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला.
मशीनही मिळाली नाही टर्फचे मैदान तयार केल्यानंतर त्याची देखभाल करण्यासाठी एक विशिष्ट मशीन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाला देण्यात येणार होती. मात्र हे मैदान तयार झाल्यानंतर अशी कुठलीही मशीन या कार्यालयाला मिळाली नसल्याचे वास्तव आहे. यासोबतच काम केल्यानंतर त्याच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्यात आल्यानेही या मैदानाची वेळेपूर्वीच ही अवस्था झाली असल्याचे सांगण्यात येत आहे.

## संक्षीप्त



### धान खरेदीसाठी शेतकरी नोंदणीला ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : - आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२५-२६ साठी शेतकरी ऑनलाइन नोंदणीला आता ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशनमार्फत गडचिरोली जिल्ह्यात धान खरेदी प्रक्रिया राबविली जात आहे. शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पत्रानुसार ही मुदतवाढ देण्यात आली आहे. शेतकरी बांधवांनी आपला पिकविलेला धान कोणत्याही व्यापाऱ्याला कमी दरात न विकता, शासनाच्या आधारभूत दराचा लाभ घ्यावा. यासाठी तालुक्यातील शासकीय धान खरेदी केंद्रावर त्वरित ऑनलाइन नोंदणी करून आपला धान केंद्रावरच विक्री करावा, असे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी व्ही. एस. तिवाडे यांनी केले आहे.





### क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्त समाज प्रबोधन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : काल दिनांक २९ डिसेंबर मौजा आंधळी ता. कुरखेडा येथे क्रांतीसुर्य



भगवान बिरसा मुंडा आदिवासी समाज बांधव यांच्या वतीने धरती आबा जननायक क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा, यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त एक दिवसीय समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी कार्यक्रमाच्या सह. उद्घाटक मा. चांगदेवजी फाये, प्रमुख मार्गदर्शक मा. डॉ. आशिष दादा कोरेटी (संस्थापक/संचालक - वजह फाउंडेशन, उपाध्यक्ष- विदर्भ ट्राईबल डॉक्टर असोसिएशन, माजी उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष - आदिवासी विद्यार्थी संघ विदर्भ नागपूर), सत्कारमूर्ती माननीय मा. लोमेश जी उसेंडी (से. नायब तहसीलदार), मा. नानाजी खुणे सर (सेवानिवृत्त मुख्याध्यापक), मा. सुधाबाई उईके (से. आश्रम शाळा कर्मचारी) सोबतच इतर पाहुणे मंडळी आणि गावकरी प्रामुख्याने उपस्थित होते.

### गुंज ते सवना रोडवर उसाची ट्रॅक्टर ट्रॉली झाली पलटी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुसद ते गुंज पर्यंतच्या रस्त्याच्या मेंटेनन्स कडे ठेकेदारांकडून दुर्लक्ष होत आहे. अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सोबत गुंज ते सवना रस्ता पूर्णपणे खड्डेमुक्त झाला आहे. या खड्डेमुक्त रस्त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून उसाने भरलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली पलटी होण्याच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे शेतकरी व ट्रॅक्टर मालक आर्थिक संकटात सापडला आहे. गुंज ते महागाव पर्यंत १४ किलोमीटरचा रस्ता पूर्णतः खड्डेयुक्त झाला आहे. दिवस रात्र या रोडवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरु राहते. प्रवासादरम्यान सुसाट धावणाऱ्या वाहनामुळे मोठ्या प्रमाणात मातीची धूळ उडत आहे. यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सध्या उसाचा हंगाम सुरू असून शेतकरी साखर कारखान्यावर मोठ्या प्रमाणात ऊस घेऊन येत आहे. गुंज गावाजवळ रस्त्याची डागडुजी सुरू आहे. परंतु ती डागडुजी थातूरमातूर होत आहे. डांबराचे अत्यल्प प्रमाणात वापरल्या जात असल्यामुळे टाकलेली गिट्टी पूर्णपणे बाजूला पसरत आहेत.त्या ठिकाणच्या रस्त्याची तात्पुरती पण तात्काळ डागडुजी करावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून सध्या जोर जोरात आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत गुंज गावाजवळ अनेक ठिकाणी भले मोठे खड्डे पडल्यामुळे ट्रॅक्टर ट्रॉली पलटी होण्याच्या घटनात वाढ होत आहे. ट्रॅक्टर ट्रॉली पलटी झाल्यामुळे ते भरण्याकरिता मजूर लावल्याने दुप्पट खर्च वाढत आहे. यामुळे ऊस रस्त्यावर पसरत असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. शेतकरी सुद्धा यामुळे आर्थिक संकटात सापडत आहे. येथे ट्रॅक्टर ट्रॉली पडण्याच्या घटना वाढत आहे.



# प्रियकरासोबत पळून गेलेल्या पत्नीने केली पतीची हत्या

## दुर्घटना दाखवण्याचा डाव फसला, रेखा उर्फ सोनी आणि विश्वजीत सांगोळे पोलिसांच्या जाळ्यात

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे

कुरखेडा : अवघ्या काही वर्षांपूर्वी आंतरजातीय प्रेमविवाहाने संसार थाटलेल्या जोडप्यातील प्रेम संपले आणि ते प्रेमाच्या नावाने निर्घृण हत्येत रूपांतर झाले. गेवर्धा येथील देवानंद सूर्यभान डोंगरवार (वय ३२) यांची त्यांची पत्नी रेखा उर्फ सोनी देवानंद डोंगरवार आणि तिचा प्रियकर विश्वजीत सांगोळे यांनी मिळून हत्या करून, सती नदीवर नवीन पुलाच्या बांधकाम रस्त्यावर अपघाताचा देखावा तयार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, रक्ताच्या ठशांनी हा खेळ उघडा पडला आणि दोघेही पोलिसांच्या तावडीत सापडले. या खळबळजनक घटनेने परिसरात हादरा उडाला आहे.

२०१८ मध्ये देवानंद याने आंधळी येथील युवती रेखा उर्फ सोनी हिच्याशी आंतरजातीय प्रेमविवाह










केला होता. सुरुवातीला संसार आनंदाने सुरू होता, पण काही काळानंतर राजोली येथील विश्वजीत सांगोळे याच्या संपर्कात आलेल्या रेखाने दोन महिन्यांपूर्वी घर सोडले. विश्वजीत हा गेवर्धा येथील महामार्ग बांधकाम कंपनीत वाहनचालक म्हणून काम करतो आणि त्याच कंपनीच्या बेस कॅम्पमध्ये राहतो, अशी प्राथमिक माहिती आहे.

दोघे कुरखेडा येथील रणप्रताप वार्डात एकत्र राहू लागले. व्यथित झालेल्या देवानंदने पत्नीला परत येण्यासाठी कित्येकदा समजावले. प्रकरण तंटामुक्त समितीपर्यंत पोहोचले, पण रेखाने उपस्थित राहण्यास नकार दिला. फोनवरही समजावणी केली, तरी तिने "आता देवानंदसोबत संसार करायचा नाही" अशी ठाम भूमिका घेतली. समितीने विवाहबंधनातून मुक्त करण्याचा सल्ला दिला, मात्र रेखाने आंतरजातीय विवाहासाठी मिळालेल्या ५० हजार रुपये मला दिल्या नंतरच सोडचिठ्ठी देईन, अशी अट घातली.

देवानंद नेहमीच कुरखेड्यात पत्नीकडे जाणे-येणे करायचा. घटनेच्या दिवशी दुपारी तो पुन्हा तिच्या घरी आला. रात्री तिघांमध्ये जोरदार वाद झाला. भांडण इतके टोकाचे झाले की, देवानंदच्या डोक्यावर प्रहार करून त्याची हत्या करण्यात आली. मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने घाबरलेल्या रेखा उर्फ सोनी आणि विश्वजीत सांगोळे यांनी देवानंदचा मृतदेह त्याच्याच मोटारसायकलने सती नदीवर नवीन पुलाच्या बांधकाम रस्त्याच्या बाजूला नेला. तेथे मृतदेह फेकून मोटारसायकल तोडून अपघात झाल्याचा देखावा तयार केला. पण हा डाव फसला! घरापासून पुलापर्यंत रस्त्यावर पडलेल्या रक्ताच्या ठशांनी पोलिसांना घटनेचा छडा लावण्यास वेळ लागला नाही. कुरखेडा पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी रेखा उर्फ सोनी देवानंद डोंगरवार आणि विश्वजीत सांगोळे यांना ताब्यात घेतले. शव विच्छेदनासाठी पाठवले असून पुढील तपास सुरू आहे.

देवानंद हा कुटुंबातील एकटाच मुलगा होता. दोन बहिणींचा विवाह झाला आहे, आईचे निधन झाले असून तो वडील आणि आजीसोबत गेवर्ध्यात राहायचा. घटनेची माहिती मिळताच वडील रात्रीच ओळख पटवण्यासाठी आले. या हत्येने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. प्रेम, विश्वासघात आणि हत्येच्या या त्रिकोणाने परिसरात खळबळ माजवली आहे. अशा घटना समाजाला काय संदेश देतात, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

## तुकाराम महाराजांची जयंती 'राष्ट्रीय दिन' म्हणून साजरा करा

### कुणबी समाज सेवा समितीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे

गडचिरोली : संत श्रेष्ठ जगतगुरू तुकाराम महाराज यांची जयंती ज्याप्रमाणे इतर थोर राष्ट्रपुरूष व संतांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरी केली जाते, त्याच धर्तीवर संत तुकाराम महाराज यांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरी करण्यात यावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकारी यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनातून कुणबी समाज सेवा समितीच्यावतीने करण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या निवेदनानुसार, राज्य शासनाने २०२६



या वर्षात भारतातील तसेच राज्यातील थोर, राष्ट्रपुरूष व थोर व्यक्ती यांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरी करण्यात यावे, यासंदर्भात परिपत्रक जाहीर केले आहे. या परिपत्रकात कुणबी समाजाचे आराध्य दैवत संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीचा कुठेही उल्लेख नाही. विशेष बाब म्हणजे राज्यातील अनेक थोर पुरूषांचे संत तुकाराम महाराज हे गुरूस्थानी होते. तरीही त्यांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरी केली जात नसल्याने समाज बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळे शासनाने संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरा करण्यासाठी सदर परिपत्रकात समाविष्ट करावे, अशी विनंती निवेदनातून केली आहे. सदर मागणीचे निवेदन निवासी जिल्हाधिकाऱ्यांना सोपविण्यात आले. यावेळी कुणबी समाज सेवा समितीचे पी. व्ही. राऊत, पी. पी. भागडकर, पुरूषोत्तम ठाकरे, नगरसेवक रमेश चौधरी, एम. आर. हारगुडे, एम. डी. कामडी, आशिष ब्राम्हणवाडे, प्रभाकर कुबडे, श्रीकृष्ण अर्जुनकर, वासुदेव बट्टे, नंदू वाईकर, अनिकेत राऊत, चेतन गोहणे आदी उपस्थित होते.

## गडचिरोलीतील विद्यार्थ्यांसाठी जागतिक ज्ञानाची दारे उघडणार

### 'द हिंदू ग्रुप' सोबत जिल्हा प्रशासनाचा सामंजस्य करार ! विद्यार्थ्यांना मिळणार दर्जेदार वाचनसामग्री

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना जागतिक घडामोडींशी जोडण्यासाठी आणि त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद आणि नगरपरिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना 'द हिंदू ग्रुप' ची विशेष शैक्षणिक पुस्तके आणि टॅब्लॉइड्स मोफत उपलब्ध करून दिली जाणार असून, या शैक्षणिक साहित्याचा संपूर्ण खर्च जिल्हा प्रशासनामार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम व विशेष सहाय्य योजनेतून केला जाणार आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला जिल्हाधिकारी कार्यालय व "द हिंदू ग्रुप" यांच्यामध्ये याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. ही विशेष प्रकाशने विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार आहेत. यामध्ये प्राथमिक विभागातील ५ ते १२ वयोगटातील मुलांसाठी 'द हिंदू यंग वर्ल्ड' हे साप्ताहिक दिले जाईल, ज्यात विज्ञान, इतिहास आणि रंजक खेळांचा समावेश असतो. तसेच, माध्यमिक विभागातील ११ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी 'द हिंदू इन स्कूल - संडे वीकेंडर' हे ३२ पानांचे टॅब्लॉइड दिले जाणार आहे, ज्यामध्ये चालू घडामोडी, वैज्ञानिक शोध आणि विविध कोडी यांसारखा माहितीपूर्ण मजकूर असेल. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या उर्वरित कालावधीसाठी ही पुस्तके दर आठवड्याला थेट शाळांमध्ये पोहोचवली जाणार असून, या दर्जेदार शैक्षणिक साहित्यामुळे गडचिरोली सारख्या दुर्गम जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मोठी मदत होणार असल्याचे यावेळी सांगितले गेले.




## खोटी ऑडिओ क्लिप व्हायरल; आमदार श्याम खोडे यांचा ठाम इन्कार

### विरोधकांकडून बदनामीचा कट; कार्यकर्ते व नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

वाशिम : सोशल मीडियावर कालपासून व्हायरल होत असलेल्या एका कथित ऑडिओ क्लिपबाबत वाशिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम रामचरण खोडे यांनी तीव्र शब्दांत स्पष्टीकरण देत सदर ऑडिओ क्लिप पूर्णतः खोटी, बनावट व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने एडिट केलेली असल्याचा ठाम दावा केला आहे. आमदार खोडे यांनी स्पष्ट केले की, संबंधित ऑडिओमधील आवाज आपला नसून, आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून चुकीची वक्तव्ये तयार करण्यात आली आहेत. जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमजी चितलांगे यांच्या पत्नीला उमेदवारी देण्यासंदर्भात पक्षांतर्गत चर्चा झाली होती, मात्र पक्षाने उमेदवारी जाहीर



केल्यानंतर आपण पूर्ण ताकदीने त्यांच्या निवडणुकीसाठी काम केले असल्याचेही त्यांनी सांगितले. "भारतीय जनता पक्षात उमेदवारी मिळाल्यानंतर सर्वांनी मतभेद विसरून उमेदवाराच्या पाठीशी उभे राहणे ही पक्षाची संस्कृती आहे. स्थानिक आमदार म्हणून मी आणि माझ्या कार्यकर्त्यांनी सर्वच भाजप उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले," असे आमदार खोडे यांनी नमूद केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे वाशिम नगरपरिषदेत अनेक वर्षांनंतर भाजपचा नगराध्यक्ष निवडून आल्याचे तसेच मंगरुळपीर नगरपालिकेत भाजपचे मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. विरोधकांनी वैयक्तिक व राजकीय बदनामी करण्याच्या उद्देशाने हा षडयंत्रपूर्वक कट रचल्याचा आरोप आमदार खोडे यांनी केला आहे. "फोनवर किंवा कोणत्याही माध्यमातून मी माझ्या जिल्हाध्यक्षांविषयी अशा भाषेत बोलूच शकत नाही," असे स्पष्ट करत त्यांनी नागरिक व कार्यकर्त्यांना अफवांवर विश्वास न ठेवता अशा क्लिप पुढे न पाठवण्याचे आवाहन केले आहे.

सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

स्थापना : 2 जुलै 1992
AN ISO 9001:2008 Certified
UDISE NO.: 27120105410

नगर परिषद, गडचिरोली द्वारा संचालित

पीएम श्री जवाहरलाल नेहरु उच्च प्राथमिक डिजीटल शाळा रामनगर, गडचिरोली

आमचे ब्रिदवाक्य "अनुभवातुन शिक्षण, हसत-खेळत शिक्षण" माणूस घडविणारी शाळा...

PM SHRI

* सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम २००७-०८ - नागपुर विभागात प्रथम क्रमांक.
* महाराष्ट्रातील नगर पालीकेची पहिली ISO नामांकन प्राप्त शाळा २०१५.
* स्वच्छ शाळा, सुंदर शाळा स्पर्धा २०२१-२२ जिल्हा प्रथम पुरस्कार.
* मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धा - टप्पा २ (२०२४-२५) राज्यात तृतीय क्रमांक प्राप्त.
* शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांचे द्वारे शैक्षणिक पर्यटन शाळा म्हणून निवड २०२५.



दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY

चंद्रपूर

GOOD MORNING

## नगराध्यक्षांकडून कचरा डेपो, जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी : विल्हेवाट लावण्याच्या सूचना

अमरावती : येथील नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांच्या नेतृत्वात स्थानिक नगरसेवकांनी जलशुद्धीकरण केंद्र व कचरा डेपोची पाहणी केली. तेथे आढळलेल्या अव्यवस्था दूर करण्याबाबत अधिकारी, कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचनाही देण्यात आल्या. त्यांच्या या भेटीमुळे पदभार स्वीकारण्याआधीच पदाधिकारी ॲक्शन मोडवर आल्याचे स्पष्ट झाले. या भेटीवेळी मुख्याधिकारी मात्र सुटीवर होते. मंगळवारी सकाळी १० वाजताच नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर व नगरसेवक नगरपंचायत कार्यालयात पोहोचले. त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला. दरम्यान विनापरवानगी गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे निर्देश दिले. त्यांच्या या अचानक भेटीमुळे नगर पंचायतीच्या कर्मचाऱ्यांत धास्ती निर्माण झाली आहे. स्वत: मुख्याधिकारी सुट्टीवर असल्याने न.पं. कार्यालयातील अनेक कर्मचारी विनापरवानगी गैरहजर आढळून आले. अशा सर्व कर्मचाऱ्यांना लगेच कारणे दाखवा नोटीस देऊन योग्य कारवाईचे निर्देश दिले. लाखो रुपये खर्च करूनही कचऱ्याच्या नियोजनासाठी अद्याप जागा तयार करण्यात आली नाही, याबाबत नगराध्यक्षांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार प्रशासनाने डम्पींग ग्राउंड निर्माण केले. मात्र सदर डम्पिंग ग्राउंड पूर्णपणे अस्तव्यस्त झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. यावेळी आधुनिक पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट करण्याचे निर्देशही नगराध्यक्षांमार्फत देण्यात आले.

## संक्षीप्त








### मोहली समितीच्या वतीने गोंडी धर्म गुरू पहांदी पारी कुपार लिंगो पेन पुतळ्याचे अनावरण

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : दिनांक 28 डिसेंबर 2025 ला मौजा मोहली ता.धानोरा जि.गडचिरोलीत येथे क्रांतिकारक भीमू कोमरा गोंडवाना गोटूल समिती मोहली यांच्या वतीने गोंडी धर्म गुरू पहांदी पारी कुपार लिंगो पेन पुतळ्याचे अनावरण सोहळा व समाज प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सर्व प्रथम गावात लिंगो पेन यात्रा काढण्यात आली. या कलश यात्रेत शेकडो गोंडीयन समाज बांधव सहभागी झाले होते. परांग वाद्याच्या तालाने वाजात गाजत लिंगो पेन यात्रा निघाली. लिंगो बाबांच्या जयघोष आवाजाने गाव दुमदुमले होते. नंतर मान्यवरांच्या हस्ते कोया पुनेम गुरू पहांदी पारी कुपार लिंगो बाबा यांच्या पुतळ्याचे विधीवत अनावरण करण्यात आले. भुमक तिरू प्रभाकर नैताम यांचे हस्ते महागोंगो पूजन करण्यात आली. त्या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक तिरू. गणेश हलामी गोंडी धर्म प्रचारक पन्नेमारा. अध्यक्ष. तिरू. मनोहर पाटील पोरेटी माजी उपाध्यक्ष जि.प.गडचिरोली. सहउदघाटक तिरू. नारायण जी पुंघाटे. प्रमुख मार्गदर्शक तिरू नंदकिशोर नैताम गोंडी साहित्यिक कुरखेडा. डॉ. आशिष कोरेटी अध्यक्ष वजह. तिरू. लोमेशजी उसेंडी. भुमक तिरू.प्रभाकर नैताम. प्राध्यापक तिरू. देवनाथ वट्टी सर. ईश्वर पुंघाटे, जैराम पाटील पदा सोबत मोठ्या संख्येत गोंडीयन सगाजन उपस्थित होते. खालील विषयावर चर्चा करून ठराव पारित करण्यात आले. भारताची जनगणना होणार आहे, त्यावेळी धर्म, गोंडी नोंद करणे. पेसा कायद्याची योग्य प्रमाणे अंमलबजावणी करण्यात याव. प्रत्येक गावात गोटूलची स्थापना करणे. गावोगावी गोंडीयन संघटना मजबूत करणे. सप्तरंगी ध्वज लावणे. गावात दारू बंदी करणे. लग्न कार्यक्रम गोंडीयन रितीरिवाजानुसार करणे. इत्यादी विषयांवर चर्चाकरून ठराव पास करण्यात आले. अशा प्रकारे मोठ्या उत्साहात कार्यक्रम पार पडला.









### विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ जिल्हा अधिवेशन: आमदार रामदासजी मसराम सर यांची उपस्थिती

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : दिनांक २८ डिसेंबर रोजी आरमोरी येथे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या जिल्हा अधिवेशनात आमदार श्री. रामदासजी मसराम यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांवर आपले विचार मांडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन आ. सुधाकर अडबाले यांच्या हस्ते झाले, तसेच मा. श्री. भाग्यवानजी खोब्रागडे, मा. श्री. जयंत येलमुले, मा. श्री. मदनजी मेश्राम, मा. श्री. तेजरावजी बोरकर, मा. सौ. लक्ष्मीताई माने, मा. श्री. योगेश कापकर, मा. श्री. शेमदेव चाफले, मा. श्री. मुकुंद म्हशाखेत्री, मा. श्री. चंद्रशेखर रहांगडाले, मा. श्री. सतिष पवार, मा. श्री. यादव धानोरकर, मा. श्री. मुरलीधर कवाडकर, मा. श्री. संदिप अर्जुनकर, मयूर वानमाळी आणि राजूभाऊ गरोदे. इतर मान्यवर उपस्थित होते.

# नववर्षाच्या पूर्वसंध्येला सिरोंचा पोलीस उपविभागाची मोठी धडक कारवाई

## ४७ लाखांहून अधिक किमतीची दारू नष्ट

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

सिरोंचा : सिरोंचा तालुक्यात नवीन वर्षाच्या जल्लोषाला कायद्याची चौकट आणि सामाजिक भानाची धार देत, पोलीस उपविभाग सिरोंचा अंतर्गत सहा पोलीस स्टेशनने एक ठोस व प्रभावी कारवाई केली. ३१ डिसेंबर २०२५ रोजी तब्बल ४७ लाख ४४ हजार ७९० रुपये किमतीची देशी व विदेशी दारू पंचासमक्ष विधीपूर्वक नष्ट करण्यात आली. "सेलिब्रेशन होऊ दे, पण बेकायदेशीर धिंगाणा नको" असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. ३१ डिसेंबर म्हणजे पार्टी, गर्दी, मद्यप्राशन-आणि त्यासोबत अपघात, भांडणे, सार्वजनिक गोंधळ यांचा धोका. हे वास्तव लक्षात घेऊनच "नवीन वर्ष संयम, सुरक्षितता व कायद्याच्या चौकटीत साजरे करा" हा सामाजिक संदेश देण्यासाठी आजच दारूचा मुद्देमाल नष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नाही, तर व्यसनमुक्ती, अपघात प्रतिबंध आणि सार्वजनिक शांततेचा ठाम इशारा आहे. मा. निलोत्पल (पोलीस अधीक्षक, गडचिरोली), मा. गोकुळ राजजी (अप्पर पोलीस अधीक्षक – प्रशासन) व कार्तिक मधिरा (अप्पर पोलीस अधीक्षक, अहेरी) यांच्या मुद्देमाल निर्गतीच्या आदेशान्वये, तसेच मा. न्यायालय सिरोंचा व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या परवानगीने ही कारवाई पार पडली. या विशेष मोहिमेत सिरोंचा, असरआली, बामणी, रेगुंटा, झिंगानूर व पातागुडम या सहा पोलीस स्टेशन हद्दीतील प्रोहिबिशन गुन्ह्यांमधील जप्त मुद्देमाल नष्ट करण्यात आला. ही संपूर्ण प्रक्रिया उपविभागीय पोलीस अधिकारी संदेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईदरम्यान पोलीस निरीक्षक निखिल फटिंग, पोलीस उपनिरीक्षक मारोती नंदे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सिरोंचा व पो.स्टे. सिरोंचा येथील पोलीस अंमलदार दासरी, अडेपु, नारमवार, मादरबोइना, तोरेम, चव्हाण यांनी सक्रिय सहभाग घेतला. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षक कुचेकर व दुय्यम निरीक्षक चौधरी यांच्या भरारी पथकाच्या उपस्थितीत ही कार्यवाही करण्यात आली. या कारवाईमुळे सिरोंचा तालुक्यात दारूबंदी कायद्याबाबत जनजागृती वाढली असून, बेकायदेशीर दारूविक्री करणाऱ्यांमध्ये कायद्याची ठोस भीती निर्माण झाली आहे. समाजहितासाठी पोलीस प्रशासन कठोर आणि सातत्यपूर्ण भूमिका घेत आहे, हा विश्वास नागरिकांमध्ये अधिक दृढ झाला आहे. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर सिरोंचा पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, सार्वजनिक ठिकाणी अनुचित वर्तन टाळावे आणि कायदा-सुव्यवस्थेला सहकार्य करावे. बेकायदेशीर दारूविक्री, साठवणूक किंवा वाहतूक आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी. सुरक्षित समाज, उज्ज्वल युवकवर्ग आणि अबाधित कायदा-सुव्यवस्था या तीन स्तंभांसाठी सिरोंचा पोलीस प्रशासन सदैव कटिबद्ध असल्याचा ठाम संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.








## कुरुड येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वाचनालय ठरत आहे सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी प्रेरणादायी केंद्र

### मनोज ढोरे यांच्या पुढाकाराने शैक्षणिक चळवळीला बळ

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी योग्य दिशा, अभ्यासाला पोषक वातावरण आणि आवश्यक साधनसामग्री मिळावी या उद्देशाने कुरुड येथे सुरू करण्यात आलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वाचनालय आज प्रेरणादायी केंद्र म्हणून ओळखले जात आहे. या वाचनालयाची संकल्पना व प्रत्यक्ष अंमलबजावणी सामाजिक कार्यकर्ते मनोज ढोरे यांच्या पुढाकाराने करण्यात आली आहे. आजच्या स्पर्धात्मक काळात शिक्षण असूनही बेरोजगारीची समस्या गंभीर बनली आहे. अनेक युवक-युवती निराशा व संभ्रमात अडकले आहेत. अशा परिस्थितीत अभ्यासासाठी शांत, स्वच्छ व शिस्तबद्ध वातावरण देणारे हे वाचनालय युवकांसाठी आशेचा नवा किरण ठरत आहे. येथे एमपीएससी, यूपीएससी, पोलीस भरती, तलाठी, ग्रामसेवक, एसएससी, बँकिंग, शिक्षक पात्रता परीक्षा तसेच विविध शासकीय व निमशासकीय परीक्षांसाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे व अभ्याससाहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना महागड्या कोचिंग क्लासेस परवडत नसल्याने हे वाचनालय त्यांच्यासाठी मोठा आधार ठरत आहे. वाचनालयामुळे युवकांमध्ये अभ्यासाची शिस्त, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक तयारीची जाणीव वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. याप्रसंगी मनोज ढोरे यांनी सांगितले की, "शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे खरे साधन आहे. युवकांना योग्य दिशा मिळाली, तर ते स्वतःचे आणि समाजाचे भविष्य उज्ज्वल करू शकतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांप्रमाणे समाज घडवण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे." या उपक्रमाला स्थानिक नागरिक, पालकवर्ग व युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, कुरुड परिसरात हे वाचनालय ज्ञान, प्रेरणा आणि आत्मनिर्भरतेचे केंद्र बनत आहे.

## जाती-धर्म नव्हे तर संसाधनांचे संरक्षण हाच आदिवासी संघर्षाचा केंद्रबिंदू : प्रा. अनिल होळी

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : दिनांक 29 डिसेंबर 2025 रोजी आंधळी (नवरगाव) येथे थोर आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त भव्य समाजप्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. अनिल होळी यांची उपस्थिती लाभली.

मार्गदर्शन करताना प्रा. होळी यांनी निसर्गाच्या नियमांनुसार मानवाने जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन एकतेने व समतेने जगावे, असा सशक्त संदेश दिला. आदिवासी संस्कृती ही संघर्षाची नव्हे, तर सहअस्तित्वाची संस्कृती असल्याचे स्पष्ट करत त्यांनी सांगितले की, आदिवासी समाजाने इतिहासात कधीही कोणत्याही जाती किंवा धर्माशी लढा दिलेला नाही. आदिवासींचा संघर्ष हा केवळ इंग्रजांविरुद्ध, सावकारांविरुद्ध आणि जल-जंगल-जमिनीच्या संरक्षणासाठी होता, आणि आजही तो त्याच स्वरूपात सुरू आहे.

इतिहास लेखनावर टीका करताना प्रा. होळी म्हणाले की, इतिहासकारांनी आदिवासींचा लढा पूर्णपणे उजेडात आणलेला नाही. 1857 पूर्वी इंग्रजांविरुद्ध झालेल्या असंख्य आदिवासी विद्रोहांना इतिहासाच्या मुख्य प्रवाहात स्थान देण्यात आले नाही, ही मोठी ऐतिहासिक चूक आहे. त्यामुळे आजचा शिक्षित आदिवासी समाजाने आपला इतिहास स्वतः लिहून तो समाजासमोर आणण्याची जबाबदारी घ्यावी, असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून आरमोरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. रामदासजी मसराम, सह-उद्घाटक मा. चांगदेवजी फाये, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. जीवन पाटीलजी नाट, उपाध्यक्ष मान. जयंतभाऊ हरडे, मा. रवींद्रजी गोटेफोडे, सत्कारमूर्ती मा. लोमेशजी उसेंडी साहेब व मार्गदर्शक मा. डॉ. आशिषजी कोरेटी, यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय परिसरातील विविध मान्यवर तसेच गावातील समस्त समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अमरावती जिल्ह्यात दुष्काळ-सदृश स्थितीवर शिक्कामोर्तब

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्यात शेतीपिकांची स्थिती दर्शवणारी अंतिम पैसेवारी बुधवारी, ३१ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आली. जिल्ह्याची सरासरी पैसेवारी ४७ असून, ती ५० पेक्षा कमी असल्याने प्रशासनाने दुष्काळसदृश स्थितीवर शिक्कामोर्तब केले आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलचे उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांनी शेतीपिकांचा अंतिम अहवाल सादर केला. या अहवालानुसार, जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील २००४ पैकी शेतीपिकांची लागवड झालेल्या १९७३ गावांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात १९७३ पैकी १९३९ गावांमध्ये शेतीपिकांची स्थिती असामान्य आढळली. गतकाळातील अतिवृष्टी, पूरस्थिती आणि सततच्या पावसामुळे या गावांमध्ये शेतीपिकांची उत्पादकता घटली आहे. केवळ ३४ गावांमध्ये शेतीपिकांची स्थिती समाधानकारक असल्याने तेथील पैसेवारी ५० पेक्षा अधिक आहे. या अहवालानुसार, धारणी तालुक्यातील १५२ पैकी केवळ ३४ गावांमध्ये शेतीपिकांची स्थिती बरी आहे. धारणी तालुका वगळता जिल्ह्यातील उर्वरित १३ तालुक्यांमधील सर्व लागवडयोग्य गावांमध्ये शेतीपिकांचे नुकसान झाले.

## 208 व्या शौर्य दिनानिमित्त आज भिमाकोरेगावी विजयस्तंभाला मानवंदना!

### शौर्य दिन विशेष !

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : राजकुमार चिंचोळकर**

भिमा कोरेगावची लढाई ही महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यामधील कोरेगाव भिमा या गावात भीमा नदीच्या काठावर झालेली एक ऐतिहासिक लढाई आहे. ही लढाई 1 जानेवारी, इ.स. 1818 रोजी इंग्रजांच्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी व पेशव्यांच्या पेशवा सैन्य यांच्यात झाली होती. ब्रिटिशांच्या बाजूने एकूण 834 सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती कॅप्टन फ्रान्सिस एफ. स्टॉँटन करीत होता. इंग्रजांच्या सैनिकांत 'बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी'चे सुमारे 500 महार जातीचे सैनिक होते, काही युरोपियन व इतर काही सैनिक होते. तर मराठ्यांच्या बाजूने 28,000 सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती पेशवा बाजीराव दुसरा करीत होता. मराठ्यांच्या सैनिकांत मराठा, अरब व गोसाई या सैनिकांचा समावेश होता. पेशवाईच्या काळात अस्पृश्यतेचे पालन मोठ्या प्रमाणावर होत होते व महार, मांग व इतर अस्पृश्यांना अत्यंत हीन वागणूक दिली जात असे, याला विरोध म्हणून महार सैनिक आत्मसन्मासाठी ब्रिटिशांच्या बाजू पेशवे व मराठ्यांविरूद्ध लढले आणि विजयी झाले. 1800 च्या दशकांत पुण्याचे पेशवे, ग्वाल्हेर संस्थानाचे शिदे, इंदूरचे होळकर, बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले असे अनेक तुकड्यांत मराठा साम्राज्य विभागलेले होते, त्यापैकी ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर हे मराठा साम्राज्याचे गट ब्रिटिश साम्राज्यात सामील झालेली होती. या युद्धात पराभूत होऊन पेशवाई व पेशवा सैन्य अस्त झाला.कोरेगाव भिमाच्या युद्धानंतर ब्रिटिशांनी शूर महार सैनिकांच्या स्मरणार्थ भीमा नदीच्या काठी 75 फूट उंच विजयस्तंभ उभारून त्यावर 20 शहीद व 3 जखमी महार सैनिकांची नावे कोरलेली असून स्तंभावर लिहिले आहे 'One of the Triumphs of the British Army of the Earth'. महार सैनिकांच्या सन्मानार्थ येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी 1 जानेवारी रोजी देशभरातून महाराष्ट्रासह शहरातील व विषेशता ग्रामीण भागातुन बौद्ध अनुयायी लाखोच्या संख्येने येत असतात. बुद्धमूर्ती व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा समोर ठेवून बुद्धवंदना घेऊन शहीद सैनिकांच्या जयस्तंभाला मानवंदना दिली नाते. ( दरवर्षी न चुकता भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवंदना देण्यासाठी भिमा कोरेगावी जायचे. त्याच परंपरेने लाखोच्या संख्येने बौद्ध अनुयायी दरवर्षी भीमा कोरेगाव पुणे येथे विजय स्तंभाला मानवंदना देण्याकरिता जातात.)






## पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

### खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

**नागपूर**
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

**अमरावती**
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

**अकोला**
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

**यवतमाळ**
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

**बुलढाणा**
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

**चंद्रपूर**
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



**आकर्षक वेतन**

संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिजाईन
- क्वॅार्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**